# राष्ट्रीय आरोग्य अभियान

# रायगड जिल्हा परिषद अलिबाग

# सन 2014 - 15

माता मृत्यु दर, बाल मृत्यु दर व प्रजनन दर कमी करणे ही राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमाचे प्रमुख उद्दीष्टे आहेत.

1) जननी सुरक्षा योजना :-

1) पात्र लाभार्थी -

- अनुसुचित जाती, जमाती, व दारिद्रय रेषेखालील माता

2) आर्थिक लाभ देण्याचे निकष -

- ग्रामीण भागात संस्थेत प्रसूती झाल्यास 700/-
- शहरी भागात संस्थेत प्रसूती झाल्यास 600/-
- घरी प्रसूती झाल्यास 500/-
- सिझेरियन प्रसूती झाल्यास संस्थेत झाल्याचे 1500/-

रुपयांचे आर्थिक लाभ दिला जातो.

रायगड जिल्हयात जननी सुरक्षा योजने अंतर्गत सन 2014 - 15 साठी 9844 उदिदष्ट आहे.

2. आशा स्वयंसेविका योजना :-

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा यशस्वीरीत्या व सातत्याने मिळाव्या हा दृष्टीकोन समोर ठेऊन ही योजना सुरु करणेत आली आहे. आशा स्वयंसेविका ही स्थानिक रहिवाशी असून तीने केलेल्या कामानुसार आशांना मोबदला देणेत येतो.

- निवड प्रक्रिया- या कार्यकर्तींची निवड ग्राम सभेत स्थानिक ग्रामपंचायती मार्फत केली जाते.
- आशा स्वयंसेविका नेमणूक -

| क्षेत्र | मंजुर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|
| आदिवासी | 113 | 113 |
| बिगर आदिवासी | 1625 | 1625 |

3) **गट प्रवर्तक नेमणूक** - आशा स्वयंसेविकांच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी गट प्रवर्तक यांची नेमणूक करण्यात येते.

| क्षेत्र | मंजुर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|
| आदिवासी | 11 | 11 |
| बिगर आदिवासी | 47 | 44 |

<table>
<tr><th>आशा</th><th>आदिवासी</th><th>बिगर आदिवासी</th></tr>
<tr><td colspan="3"><u>आशा नियुक्ती</u></td></tr>
<tr><td>रायगड</td><td>113</td><td>1665</td></tr>
<tr><td colspan="3"><u>आशा प्रशिक्षण</u></td></tr>
<tr><td>मोडयुल 1</td><td rowspan="6">113</td><td>1625</td></tr>
<tr><td>मोडयुल 2</td><td>1625</td></tr>
<tr><td>मोडयुल 3</td><td>1625</td></tr>
<tr><td>मोडयुल 4</td><td>1625</td></tr>
<tr><td>मोडयुल 5</td><td>1625</td></tr>
<tr><td>मोडयुल 6</td><td>1625</td></tr>
</table>

## 4. राष्टीय बाल स्वास्थ कार्यक्रम -

या कार्यक्रमांतर्गत 0 ते 6 वर्षवयोगटातील अंगणवाडीमधील मुलांंची आरोग्य तपासणी वर्षातून 2 वेळा तसेच 6 ते 18 वयोगटातील विदयार्थ्यांची आरोग्य तपासण्ी वैदयकिय पथकांमार्फत करणेत येते.

## 5. अर्श कार्यक्रम :-

19 वर्ष वयोगटामध्ये  मुलामुलींच्यामध्ये शारीरीक, मानसिकव भावनिक बदल होतो. त्यापासून निर्माण होणा-या समस्या व त्यांंचे निराकरण,या वयामध्ये घ्यावयाचा पौष्टीक आहार,यावयामध्ये होणारे आजार, अस्वच्छतेमुळे होणारे आजार व त्यापासून दूर राहणेसाठीच्या

उपाययोजना, आवश्यक आदर्श सामाजिक व कौटूंबिक वर्तन, विवाहपुर्वीचे मार्गदर्शन सल्ला व समुपदेशन कुटूंब नियोजनाची साधने वैदयकिय तपासणी व उपचार या संबधित मार्गदर्शन केले जाते. जिल्हयामधील शहरातील 10 ते 19 वर्ष वयोगटातील शाळा महाविदयालयात किशोरवयीन मुलामुलींसाठी आरोग्य चर्चासत्र आयोजित केले जातात. या चर्चा सत्रानंतर प्रश्न पेटी तयार करुन त्याचे निलाकरण या क्लिनिकमध्ये केले जाते. चर्चासत्रामध्ये मुलांना अश कर्यिक्रम माहिती पुस्तिकांचे वितरण करणे अर्श कार्यक्रमांतर्गत मैत्री क्लिनिकची माहिती फलके तयार करुन शाळा महाविदलयांमध्ये प्रसिध्द करणे, चर्चासत्रानंतर मुला मुलींना अल्पोपहार देणे या बाबी या कार्यक्रमांतर्गत राबविल्या जातात.

सदर कार्यक्रम तालुका कर्जत येथे एनआयआरआरएच, परळ या स्वयंसेवी संसथेमार्फत पायलट बेसीसवर राबविणेत येत आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा रुग्णालय अलिबाग, उपजिल्हा रुग्णालय पेण, माणगाव ,कर्जत, ग्रामीण रुग्णालय कशेळे व तालुका कर्जत येथील पाच प्रा.आ.केंद्रांत करणेत आली आहे. या योजनेत किशोरवयीन मुलां - मुलींना आरोग्य विषयक माहिती व त्यांच्या समस्या जाणून त्यांचे प्रबोधन करणेसाठी वरील नमूद आठ ठिकाणी मैत्री क्लिनिकची सुरुवात केली आहे.

6. <u>टेलेमेडिसीन</u> :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दुर्गम आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करु देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील जिल्हा व उपजिल्हा रुग्णालय येथे टेलिमेडिसीन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण 27 जिल्हा व 30 उपजिल्हा रुग्णालयांमध्ये टेलिमेडिसीन सुविधा कार्यान्वित आहे. रायगड जिल्हयामध्ये जिल्हा रुग्णालय, अलिबाग व उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे टेलिमेडिसीन केंद्र कार्यान्वित आहेत. या कार्यक्रमांतर्गत आवश्यक विजेची साधने, इलेक्ट्रॉनिक साधने इत्यादिंनी सुसज्य आहे. रायगड जिलहयातील टेलिमेडिसीन केंद्रामार्फत परिचार्या प्रशिक्षण केंद्र रायगड यांच्या साठी ऑनलाईन नर्सिंग ट्रेनिंग सुरु केली आहे. नर्सिंग ट्रेनिंगदर मंगळवारी दुपारी 12.00 ते 1.00 वाजता नानावटी रुग्णालय, मंबई येथून देण्यात येते. तसेच राज्य स्तरावरुन आयोजित व्हिडीओ कॉन्फरन्सिंग देखील येथून केल्या जातात. वैदयकिय अधिकारी, परिचारीका यांना आरोग्य क्षेत्रातील नविन माहिती मिळावी म्हणून मार्गदर्शनपर कार्यशाळा घेतल्या जातात. Psychiapry Co-morbidity & associated illness म्हणजेच म्हणजेच मनोरोग आणि त्याच्याशी संदर्भात असलेले आजारया कार्यशाळेचे आयोजन देखील या मार्फत केलेले आहे. तसचे

अतिदक्ष रुग्णांच्या संदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्दारे रिपोर्ट पाठवून मुंबई येथील मोठया रुग्णालयांकडून मार्गदर्शन मागविले जाते.

<u>टेलिमेडिसीन कामकाज पद्धती -</u>

- या पद्धतीमध्ये रुग्ण तज्ञ केंद्राकडे ऑफलाईन आणि व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्दारे संदभिर्त केले जातात. Radiology,Endocrine dermatology, Neurology Medicine असे विविध प्रकारचे बाहयरुग्ण व अंतररुग्ण टेलिमेडिसीनकडे संदर्भित केले जातात.
- जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी तज्ञ केंद्रांकडे रुग्ण संदर्भित केल्यानंतर संबधित डॉक्टरांना प्रती रुग्ण रु. 100/- याप्रमाणे मानधनदेण्यात येते.
- रुग्ण Prognosis पद्धतीने तज्ञ केंद्रांकडे संदर्भित केले जातात.

या योजनेंतर्गत अतिदक्षता विभागातील रुग्णांचे रिपोर्ट उच्चस्तरीय हॉस्पिटलच्या तज्ञांचा सल्ला जाणून घेण्यासाठी Prognosys System व्दारे पाठवून त्याव्दारे सल्ला प्राप्त करुन त्यानुसार त्या रुग्णांवर उपचार केला जातो.

7. <u>भारतीय सार्वजनिक आरोग्य मानांकन (आय.पी.एच.एस.)-</u>

राष्टीय आरोग्य अभियान अंतर्गत भारतीय सार्वजनिक आरोग्य मानांकनात जास्त प्रसुती होणा-या आरोग्य संस्थांची निवड केली जाते. या कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हयात 1 जिल्हा रुग्णालय, 1 उपजिल्हा रुग्णालय, 4 ग्रामीण रुग्णालय, 19 प्रा.आ. केंद्र व 9 उपकेंद्रांची निवड करणेत आली आहे.

8. <u>कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया</u> :-

या योजनें ंतर्गत देण्यात येणारे अनुदान -

- पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेसाठी रु. 1500/-
- स्त्री नसबंदी शस्त्रक्रियेसाठी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर या लाभार्थींसाठी
  रु. 1000/- व दारीद्रय रेषेवरील लाभार्थीस रु. 650/- इतका लाभ दिला जातो.

9. <u>नियमित लसीकरण</u> :-

❖ नियमित लसिकरण कार्यक्रमांतर्गत गाव पातळीवर निश्चित दिवशी आरोग्य सेवासत्रे आयोजित करण्यात येतात.

❖ आरोग्य सेवा सत्राचेवेळी नियमित लसिकरणासोबत इतर आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. उदा. जोखमिच्या माता, गरोदर माता, प्रसुती पश्चात माता व नवजात अर्भके, कुटूंब कल्याण शस्त्रक्रियेकरीता पात्र लाभार्थी इत्यादी देखील माहिती घेतली जाते.

❖ आरोग्य सेवा सत्रास सहाय्यक परिचारीका, प्रसविका, आरोग्य कर्मचारी (पु) व आधारगटातील स्वयंसेवक उपस्थित असतात. तसेच आरोग्य सहाय्यक (पु / स्त्री) लसीचा साठा व लसीकरणाचे इतर साहितय ने- आण करतात.

❖ आरोग्य सेवासत्र प्रामुख्याने उपकेंद्राच्या इमारतीत, अंगणवाडी येथे आयोजित केले जाते.

- ❖ आरोग्य सेवा सत्रास लसीकरणाचे व इतर लाभार्थी बालविण्यासाठी आधार गटाची स्थापना करण्यात आली आहे. प्रामुख्याने अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्यंसेवक, बचत गटाचे कार्यकर्ते यांचा सहभाग असतो.
- ❖ आरोग्य सेवा सत्राच्या वेळी माता बाल संरक्षण कार्ड दिले जाते.

10. <u>आयुष कार्यक्रम</u> :-

आयुष कक्षांतर्गत रुग्णांना आधुनिक रुग्णालयामध्ये आधुनिक चिकित्सा पध्दतींबरोबरच आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, होमिओपॅथी, सिध्द या प्राचीन/ परंपरागत/ समांतर/ या वैदयकिय शाखांमध्ये समाविष्ट होणा-या चिकित्सापध्दतींचा लाभ करुन दिला जातो. याकार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर 1 जिल्हा आयुष वैदयकिय अधिकारी, जिल्हा / उपजिल्हा/ ग्रामीण/कुटीर रुग्णालय स्तरावर 15 आयुष वैदयकिय अधिकारी कार्यरत आहेत. सदर आयुष सेवा जिल्हयात जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय येथे पुरविली जाते.

11. <u>जननी - शिशु सुरक्षा कार्यक्रम</u> :-

केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या सुचनांनुसार राज्यामध्ये जननी - शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत माता व नवजात अर्भकांना सार्वजनिक आरोग्य संस्थामध्ये संपूर्ण मोफत सेवा पुरविण्यात येत आहेत. यामध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, दारिद्रय रेषेखालील, दारिद्रय रेषेवरील तसेच प्रसूतीसाठीच्या कोणत्याही खेपेच्या गरोदर स्त्रीस 42 दिवसांपर्यंत व 30 दिवसाच्या आत

नवजात अर्भकास सर्व प्रकारच्या आरोग्य विषयी सेवा सर्व शासकिय आरोग्य संस्थामध्ये मोफत देण्यात याव्यात अशा सुचना प्राप्त आहेत. या योजनेंतर्गत रायगड जिल्हयात 71 शासकिय वाहने कार्यान्वित करणेत आली आहेत.

12. प्रा.आ. केंद्र/उपकेंद्र/ (नविन बांधकामे/ दुरुस्ती) :-

1. नविन उपकेंद्र बांधकाम 7 मंजूर आहेत व 7 पुर्ण आहेत. ( उपकेंद्र वाळण,मांघरुण, जीते, आष्टे, परळी, नवखार, धामणी ही आहेत)
2. नविन प्रा.आ. केंद्र बांधकाम - कर्मचारी निवासस्थाने दोन बांधकामे मंजूर आहेत. ( प्रा.आ.केंद्र साई व कडाव ही आहेत) सदर कामे प्रगती पथावर आहेत.

13. पी.सी.पी.एन.डी.टी. कार्यक्रम :-

मुलींची गर्भात होणारी हत्या रोखण्यासाठी पी.सी.पी.एन.डी.टी. कायदा भारतात अंमलात आला आहे. या कायदयानुसार सोनोग्राफीव्दारे गर्भलिंग निदान करणा-या डॉक्टरांवर अजामीन पात्र गुन्हा व 3 ते 5 वर्ष कैद व रु. 50,000/- पर्यंत दंडात्मक कारवाई करण्याची तरतुद कायदयात आहे.

तसेच जिल्हयातील सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यासाठी जिल्हा व राज्यपातळीवर खास भरारी पथकांची नियुकती केली आहे.

सदर तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्यास सुरुवात केल्याने स्त्रीभ्रुणहत्येचे प्रमाण अधिक वाढल्याने शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यानुसार सदर कायदयाची खास पथके नेमून अंमलबजावणी केली जाते.

सदर कार्यक्रमामध्ये फक्त आरोग्य विभागाचा सहभाग नसून महसूल विभाग, पोलिस, नगरपरिषद येथील अधिका्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. दक्षता (टास्क फोर्स ) कमीटीची व सल्लागार समितीची मा. जिल्हाधिकारी, रायगड - अलिबाग यांच्या अध्यक्षतेखाली घेतली जाते.

अंमलबजावणी करणारी यंत्रणा-

- केंद्र पर्यवेक्षकीय व राज्य पर्यवेक्षकीय समिती.
- राज्यसमुचित प्राधिकारी
- जिल्हा सल्लागार समिती आणि जिल्हा समुचित प्राधिकारी
- तालुका समुचित प्राधिकारी
- कायदयाच्या कलम 17 च्या 1 ते 5 नुसार समुचित प्राधिकारी नेमले आहेत.

लिंग गुणोत्तर प्रमाण -

| SR. NO. | DISTRICT | SEX RATIO ALL AGE GROUP | | | 0-6 AGE GROUP CHILD SEX RATIO | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | 2001 | 2011 | 1991 | 2001 | 2011 |
| 1 | INDIA | 927 | 933 | 940 | 946 | 927 | 914 |
| 2 | MAHARASTRA | 934 | 922 | 925 | 946 | 913 | 883 |
| 3 | RAIGAD | 1010 | 975 | 955 | 961 | 939 | 924 |

गर्भजल निदान तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्यास सुरुवात केल्याने स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण अधिकच वाढले आहे. भविष्यात मुलींचे प्रमाणकमी होऊ नये याकरीता या कार्यकामची सुरुवात करणेत आली आहे.

14. मोबाईल मेडिकल युनिट :-

मोबाईल मेडिकल युनिट कार्यक्रमांतर्गत डोंगराळ व अति दुर्गम भागातील लाभार्थींना आरोग्य सेवेचा लाभ घेता यावा या उद्‍देशाने मोबाईल मेडिकल युनिट हा कार्यक्रम कार्यान्वित करणेत आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हयासाठी एक मोबाईल मेडिकल युनिट मंजूर करणेत आला असून या युनिटसाठी कै. आबासाहेब उत्तमराव बेंडसे चॅरिटेबल ट्रस्ट, लाईफ लाईन हॉस्पिटल, पनवेल या स्वयंसेवी संस्थेची निवड करणेत आली होती . त्यांनी सदर योजना राबविणार नसलेचे या कार्यालयास कळविलेने सदर कार्यक्रम तालुका आरोग्य अधिकारी कर्जत यांचेस्तरावर माहे जुलै 2012 पासून देणेत आला आहे. या अंतर्गत प्रा.आ. केंद्र कळंब अंतर्गत पोशीर, देवपाडा, ओलमन,चाहुची वाडी, बोरगाव,सलोख, वारे, पोही, करुग, मानकिवली, माले, पाषाणे, आर्डे, आसे, खाडयाचा पाडा, कळंब प्रा.आ. केंद्र आंबिवली अंतर्गत शिंगढोल, टेंभरे,पेठ, जांमरुंग, रजपे, धामणी,मोग्रज,मालेगाव, पिंगळस, खनंद, कोठींब, कशेळे, अंजप, कळबोली, अश्रड, निड, सुगवे, नालधे, गढवन प्रा.आ. केंद्र खांंडस अंतगर्त पाथरज, मार्गाचीवाडी,शिलार,धोत्रे, किकवी, चई, झुगरेवाडी, चेवणे,बलीवरे, नांदगाव,अंभेरपाडा,चाफेवाडी,ताडवाडी, खंाडस, तुंगी प्रा.आ. केंद्र कडाव अंतर्गत पिंपळपाडा प्रा. आ. केंद्र नेरळ अंतर्गत कोदिवले, बिरदोले,अवसरे, निकोप,मालेगाव इत्यादी गावांचा समावेश आहे.

15 सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम :-

सिकलसेल हा लाल रक्त पेशींमध्ये होणारा आजार आहे. आपल्या रक्तात लाल पेशी व पांढ-या पेशी अशा दोन पेशी असतात. सर्वसाधारण व्यक्तींच्या शरीरातील लाल रक्तपेशींचा आकार गोल असतो. पण सिकलसेल आजारामध्ये या पेशींचा आकार ऑक्सीजन मिळाला नाही तर विळयासारखा होतो याला सिकलसेल आजार म्हणतात. **सिकलसेल आजाराचे दोन प्रकार**--1. सिकलसेल पिडित व्यक्ती 2. सिकलसेल वाहक व्यक्ती

<u>सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमाची उद्दिष्टे</u> :-

- या आजारातील जनतेमधील प्रमाण शोधून काढणे.
- जास्त लोकांनी सिकलसेल आजाराची चाचणी करुन घ्यावी यासाठी त्यांना प्रवृत्त करणे.
- प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय पातळीवर सिकलसेल निदानाची सोय उपलब्ध करुन जास्तीत जास्त सिकलसेल आजारग्रस्त रुग्ण व वाहक शोधून काढणे.
- सिकलसेल वाहक व पिडीत व्यक्तींनी दुसऱ्या वाहक व पिडीत व्यक्तींशी विवाह टाळावा यासाठी समुपदेशन करणे.
- यापुर्वी विवाह सिकलसेल वाहक- वाहक, पिडीत पिडीत, वाहक - पिडीत अशा जोडप्यांना ओळखून त्यांना यापूढे सिकलसेल आजार ग्रस्त बालक जन्माला येऊ नये यासाठी गरोदर पणी गर्भजल चाचणी करणे आवश्यक आहे.